पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७
जा.क्र.ड/१३/कावि/०१/२०१७,
दिनांक ०२/०१/२०१७

प्रति,
मा.श्री/श्रीमती -----------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------

विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. ११
दिनांक ०५/०१/२०१७

महोदय,

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१७ ची मासिक सभा ड क्षेत्रीय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे गुरुवार दिनांक ०५/०१/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
**सही/-**
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रिय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र : ११ ,
दिनांक:- ०५/०१/२०१७

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र.११**

दिनांक ०५/०१/२०१७ वेळ दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१६ ची मासिक सभा गुरुवार दिनांक ०५/०१/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील कार्यपत्रिका क्रमांक ८ माहे ऑक्टोबर २०१६ ची मासिक सभा दिनांक १७ /१० / २०१६ , कार्यपत्रिका क्रमांक ९ माहे नोव्हेंबर २०१६ ची मासिक सभा दिनांक ४/११/२०१६ व कार्यपत्रिका क्र. १० माहे डिसेंबर २०१६ रोजीच्या सभांचा सभावृत्तांत कायम करणे

२) केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ४५ हा प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषित करणेबाबत

३) केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय

कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४३, ४४,४६,४७,४८,५४,५५,५६ व ५७ हे ९ प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषित करणेबाबतच्या प्रस्तावास मा. ड प्रभाग समितीने ठराव संमत झाला असुन याबाबत दै. चाहुल मध्ये दिनांक ४/१२/२०१६ रोजी व दै. संध्यानंद मध्ये दिनांक ६/१२/२०१६ रोजी जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन नागरीकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु नागरीकांकडून एकही हरकत विहीत मुदतीत ड क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त न झालेली नाही. त्यामुळे उक्त प्रभाग क्र. ४३,४४,४६,४७,५४,५५ व ५७ हगणदारी मुक्त करणेबाबतचा विषय कायम करणेबाबत क्षेत्रीय अधिकारी ड क्षेत्रीय कार्यालय यांचा प्रस्ताव

४) प्रभाग क्र. ५५ मधील कुणाल आयकॉन रोडवरील आरक्षण क्र. २३६७A पिंपळे सौदागर येथे क्रीडा मैदान आहे. सन १९९६ मध्ये विकास कामाचे आरक्षण पडले त्यावेळेस या क्रीडा मैदानासाठी स्वर्गीय बाळासाहेब बाजीराव कुंजीर यांनी आपल्या मालकीची संपुर्ण जागा यासाठी दिली . ते एक उत्कृष्ट कबड्डी खेळाडू होते. अखिल भारतीय कबड्डी पंच होते व ते पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य देखील होते. त्यांनी आपले काळात अनेक नामवंत कबड्डी खेळाडू घडविले, कबड्डी खेळाला एक मानाचे स्थान मिळवून दिले. अशा सामाजिक, राजकीय, क्रीडा या विविध क्षेत्रामध्ये अमुल्य योगदान असणारे स्वर्गीय बाळासाहेब बाजीराव कुंजीर यांच्या अविस्मरणीय कार्यासाठी प्रभाग क्र. ५५ मधील क्रीडा मैदानाला अखिल भारतीय कबड्डी पंच स्वर्गीय बाळासाहेब बाजीराव कुंजीर क्रीडांगण असे नामकरण करण्याबाबत

५) मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय.

**सही/-**

**प्रशासन अधिकारी, तथा**

**सचिव, सभाशाखा**

ड क्षेत्रीय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी, पुणे-१७

जा.क्र.ड/१३/कावि/०२ /२०१७

दिनांक : ०२/ ०१ /२०१७